दाखल दिनांक : २८/०३/२०११
नोंदणी दिनांक : २८/०३/२०११
निकाल दिनांक : २१/०५/२०१८
कालावधी : वर्षे महिने दिवस
: ०७ ०१ २३

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, लोहमार्ग दौंड यांच्या न्यायालयात**
(पीठासीन अधिकारी — ओ. शि. पाटील)

**नियमित फौजदारी प्रकरण क्रमांक २७/२०११ निशाणी क्रमांक :— ५६**

**CNR : MHPU19-001488-2011**

महाराष्ट्र राज्य, तर्फे
लोहमार्ग पोलिस ठाणे, दौंड.
ता. दौंड, जि. पुणे. .. **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

०१. **अभिमन्यू दत्तात्रय घोडके,**
**वय — ४२ वर्षे, धंदा — काही नाही,**
**रा. टी.व्ही. केंद्रा समोरील झोपडपट्टी,**
**सोलापूर.**

०२. राहूल नंदकुमार येवलेकर,
वय — ३७ वर्षे, धंदा — कारागिर,
रा. ४१८, रविवार पेठ, मोती चौक, पुणे.

०३. सागर धोंडीराम खर्डीकर,
वय — ३६ वर्षे, धंदा — कारागिर,
रा. ५१०, रविवार पेठ, मोती चौक, पुणे. .. **आरोपी**

**ॲड. श्री. ए. पी. आडसकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**
**ॲड. श्री. एस. टी. यरोळ आरोपींचे विधिज्ञ.**

# न्यायनिर्णय

**(घोषित दिनांक २१/०५/२०१८)**

०१. आरोपींविरुध्द् भारतीय दंड संहितेच्या कलम ४११ सह ३४ अन्वये दंडनीय अपराधाकरीता आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

०२. थोडक्यात, अभियोग पक्षाचे म्हणणे असे आहे की, फिर्यादी नामे सुरेखा जनार्दन ताजणे, वय — ४१ वर्षे, धंदा — ब्युटी पार्लर, रा. एन.एल—१ बी/३८१८, नेरुल सेक्टर, घरकुल अपार्टमेंट, फेज — २, नेरुळ, नवी मुंबई या दिनांक २३/११/२०१० रोजी बेलवंडीला जाण्यासाठी त्यांच्या आई आणि बहिणीसह पुण्याहून मनमाड पॅसेंजर गाडीमध्ये रात्री १२.३० वाजता बसले होते. रात्रीची वेळ असल्याने ते सर्वजण झोपी गेले होते. त्यांची गाडी दौंड रेल्वे स्थानकावरुन निघाल्यानंतर फिर्यादीला जाग आली असता तिची पर्स तिथे नव्हती. त्यांनी इकडे—तिकडे पर्सचा शोध घेतला. परंतु सदर पर्स मिळून आली नाही. त्यात त्यांचे सोन्याचे मंगळसूत्र, अंगठी, रु. ८००/— रोख आणि सॅमसंग कंपनीचा भ्रमणध्वनी संच होते. त्यामुळे फिर्यादीने फिर्याद दाखल केली.

०३. फिर्यादीने दिलेल्या या फिर्यादीवरुन दौंड लोहमार्ग पोलिस ठाणे यांच्याकडे वर नमूद दंडनीय अपराधाकरीता गुन्हा नोंदवही क्रमांक २८/२०१० नोंदविण्यात आला. अभियोग पक्षाच्या म्हणण्याप्रमाणे आरोपी अभिमन्यूला अटक करण्यात आली असता त्याने आरोपी क्रमांक २ आणि ३ यांना दागिने विकल्याचे सांगितले आणि त्यांचे दुकान दाखविले. परंतु त्यांनी आरोपीकडून दागिने विकत घेतल्याचे नाकारले आहे. त्याप्रमाणे आरोपी अभिमन्यूचे निवेदन नोंदविण्यात आले. त्यानंतर तपासिक तपासिक अंमलदार यांनी महत्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवून

आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. मी आरोपी अभिमन्यूचा खटला आरोपी कमांक २ आणि ३ यांच्यापासून विभक्त करुन त्यांच्याविरुध्द निशाणी कमांक ३१ वर भारतीय दंड संहितेच्या कलम ४११ सह ३४ अन्वये दंडनीय अपराधाकरीता आरोप निश्चित केले. आरोपांचा तपशील आरोपींना वाचून दाखविण्यात आला आणि समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा केल्याचे अमान्य केले आणि खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०५. विचारासाठीचे मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसासह खाली नमूद करीत आहे :

| **अ. नं.** | **विचारासाठीचे मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१) | आरोपींनी, त्यांच्या समान उद्देशाच्या पुर:सरणार्थ दिनांक २३/११/२०१० रोजीनंतर आरोपी अभिमन्यूकडे सोन्याचे दागिने हे चोरीचे असल्याचे माहिती असून देखील त्याच्याकडून विकत घेऊन भारतीय दंड संहितेच्या कलम ४११ सह ३४ अन्वये दंडनीय अपराध केल्याचे अभियोग पक्षाने निसंदिग्धपणे सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ०२) | आदेश काय ? | :अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा कमांक १ व २ बाबत</u>** :—

०६. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी (असा १), अनिता मारुती गायकवाड (असा २), सिंधू रंगनाथ करंडे (असा ३), शिवाजी भाऊराव वीर (असा ४) आणि बाबू अंबरीश बळगेरी (असा ५) यांच्या साक्षी अुनक्रमे निशाणी क्रमांक ३८, ४०, ४१, ४६ आणि ५० वर नोंदविण्यात आल्या आहेत. फिर्याद निशाणी क्रमांक ३९ वर आहे.

०७. अनिता (असा २) ही फिर्यादीची बहिण आणि सिंधू (असा ३) ही फिर्यादीची आई आहे. या तिघींनी फिर्यादीप्रमाणे (नि ३९) घटना कथन केली आहे. त्यांनी आरोपी क्रमांक १ अभिमन्यूविरुध्द आरोप केलेले आहेत. परंतु त्यांनी आरोपी क्रमांक २ आणि ३ विरुध्द काहीही आरोप केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी क्रमांक २ आणि ३ विरुध्दचे आरोप सिध्द करण्यास या तिघींची साक्ष उपयुक्त नाही.

०८. शिवाजीने (असा ४) असे कथन केले आहे की, दिनांक २४/१२/२०१० रोजी ते लोहमार्ग पोलिस ठाणे, दौंड येथे पोलिस हवालदार या पदावर कार्यरत असताना तपास अधिकारी काळे यांच्या गु. र. क्रमांक ५७/१० या प्रकरणाचा तपास होता. त्यांनी आरोपीचा ताबा घेतल्यानंतर आरोपीने मंगळसुत्र चोरल्याचे कबुल केले आणि ते पुणे येथे विक्री केल्याचे सांगितले. त्यानंतर ते पुण्याला गेले आणि पोलिस मदत घेतली. त्यानंतर ते आरोपी सांगीतल्याप्रमाणे रविवार पेठेत गेले. त्याठिकाणी आरोपीने सोन्याचे दुकान दाखवले. त्यावेळी पंच त्यांच्या सोबत होते. तेथे काळे यांनी चौकशी केली असता दुकानात हजर असलेल्या दोन इसमांनी सोने विकत घेतल्याचे अमान्य केले. त्यामुळे त्यांना त्यांनी ताब्यात घेतले. अंबरीशने (असा ५) असे कथन केले आहे की, तो आरोपींना ओळखत नाही. त्याला या प्रकरणाबद्दल काहीही माहिती नाही. पोलिसांनी त्याच्या सह्या घेतल्या होत्या. त्याने निवेदन पंचनाम्यावर त्याची सही असल्याचे मान्य केले. परंतु त्यातील

मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. त्यामुळे अभियोग पक्षाने निवेदन पंचनामा सिध्द केला आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपींविरुध्दचे आरोप अभियोग पक्षाने निसंदिग्धपणे सिध्द केले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपी कमांक २ आणि ३ यांची निर्दोष मुक्तता करणे कमप्राप्त आहे. त्यामुळे, मुद्दा कमांक १ चे उत्तर मी नकारार्थी देत आणि मुद्दा कमांक २ च्या उत्तराच्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

०१) आरोपी कमांक २ आणि ३ यांची भारतीय दंड संहितेच्या कलम ४११ सह ३४ अन्वये दंडनिय अपराधाकरिता फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते

०२) त्यांचे स्व—बंधपत्र आणि जामीनपत्र रद्द करण्यात येते. त्यांना सोडुन देण्यात येते.

०३) आरोपी कमांक १ विरुध्द खटला पुढे चालविण्यात येतो. त्याच्या विरुध्द अजामीनपात्र अधिपत्र आणि जामीनदारास नोटीस काढण्यात येते.

( ओ. शि. पाटील )
दिनांक :— २१/०५/२०१८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, दौंड.

नियमित फौजदारी खटला कमांक ७३/२००७
निशाणी कमांक २३

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार कमांक १ ची साक्ष**

मी याद्वारे शपथेवर निवेदन करते की,

माझे नांव :— जमील मोहम्मद हुसेन दर्जी,
वय :— २५ वर्षे,
धंदा :— व्यापार,
राहणार :— सोलापूर.

**सरतपास**
(अभियोग पक्षातर्फे स.स.अ. श्री. ए.ए. डोके)

१. ते तुम्ही आरोपी सचिन गायकवाड ओळखतात. तसेच ते आरोपी दिपक गायकवाड व संतोष जाधव यांनाही ओळखतात. पोलिसांनी त्यांना पोलिस ठाण्यात बोलाविले होते. पोलिस ठाण्यात त्यावेळी तुम्ही आरोपी सचिन गायकवाड आणि दुसरी एक व्यक्ती होती. त्यावेळी तुम्ही आरोपी सचिन गायकवाड याने सोने दाखवितो असे सांगितले. त्यानंतर ते, तुम्ही आरोपी सचिन व पोलिसांसोबत पुना नाका सोलापूर येथे गेले. त्यानंतर पोलिसांनी सोनाराला बोलावून आणले. तेथे सोनाराने सोन्याच्या दोन लगडी काढून दिल्या. ते पुन्हा सांगतात की, सोनाराने तीन लगड एक १४ ग्रॅमची व दोन प्रत्येकी ४ ग्रॅमच्या दिल्या होत्या. त्यानंतर त्यांनी जप्ती पंचनाम्यावर सह्या केल्या. निवेदन आणि पंचनाम्यावर त्यांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे नि. क्र. २४ आणि २५ देण्यात आल्या. जप्त लगड दाखविले सोने मी ओळखू शकतो.

**उलटतपास आरोपी कमांक १ आणि २ तर्फे वकील श्री. यरोळ**

२. मला पोलिस स्टेशनमध्ये किती वाजता बोलाविले होते, हे सांगता येणार नाही. हे खरे आहे की, जप्त केलेले सोने आज कोर्टासमोर नाही. हे खरे आहे

की, यापूर्वी मी एकदा कोर्टात साक्ष दिलेली आहे. हे खरे आहे की, पोलिसांनी पंचनामा लिहिला आणि मी त्यावर सही केली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक :— १३/१०/२००८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, दौंड
सोलापूर येथील दौरा.

नियमित फौजदारी खटला क्रमांक ७३/२००७
निशाणी क्रमांक २८

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ ची साक्ष**

मी याद्वारे शपथेवर निवेदन करते की,

माझे नांव :— शशिकांत उत्तम खळसोडे,
वय :— ३० वर्षे,
धंदा :— हमाल,
राहणार :— शिवाजी नगर, सोलापूर.

**सरतपास**
(अभियोग पक्षातर्फे स.स.अ. श्री. ए.ए. डोके)

१. ते तुम्ही आरोपी सचिन गायकवाड यास ओळखतात. त्यांना सोलापूर पोलिस स्टेशन येथे पंच म्हणून बोलाविण्यात आले होते. तेथे त्यांची सही घेण्यात आली. ते पोलिसांबरोबर कोठेही गेलो नाही. माझेसमोर काहीही जप्त करण्यात आले नाही. मला मेमोरंडम पंचनामा आणि जप्ती पंचनामा दाखविण्यात आला असून त्यावर माझे सह्या आहेत. त्यास निशाण क्रमांक २४ आणि २५ देण्यात आलेला आहे.

**फितूर**

**उलटतपास आरोपी क्रमांक १ आणि २ तर्फे वकील श्री. यरोळ**

**२.** मला पोलिस स्टेशनमध्ये किती वाजता बोलाविले होते, हे सांगता येणार नाही. हे खरे आहे की, जप्त केलेले सोने आज कोर्टासमोर नाही. हे खरे आहे की, यापूर्वी मी एकदा कोर्टात साक्ष दिलेली आहे. हे खरे आहे की, पोलिसांनी पंचनामा लिहिला आणि मी त्यावर सही केली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक :— १३/१०/२००८. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, दौंड
सोलापूर येथील दौरा.

नियमित फौजदारी खटला क्रमांक ७३/२००७
निशाणी क्रमांक ७६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ ची साक्ष**

मी याद्वारे शपथेवर निवेदन करते की,

माझे नांव :— राणी तिरवियम नाडार,
वय :— ३३ वर्षे,
धंदा :— घरकाम,
राहणार :— रूम क्रमांक ११, सकापाळ चाळ, बोरसापाडा, पोईसर, कांदीवली, पश्चिम, मुंबई.

**सरतपास**
(अभियोग पक्षातर्फे स.स.अ. श्री. ए.ए. डोके)

१. कन्याकुमारी हे त्यांचे मुळ गाव असुन ते मुंबईत राहतात. दिनांक ०१/०६/२००६ रोजी ते, त्यांचे आई वडील आणि बहिणीचा एक मुलगा आणि एक मुलगी असे कन्याकुमारीहुन मुंबईला कन्याकुमारी एक्सप्रेस मध्ये जात होते. रात्री साडे आठ वाजता त्यांची गाडी सोलापुर रेल्वे स्थानकावर थांबली होती. त्यावेळी ते खिडकीच्या कडेला बसले होते. त्यांची गाडी सुरू झाल्यानंतर कोणीतरी त्यांच्या गळ्यातील २५ ग्रॅम वजनाची सोन्याची हिसका मारून नेली. त्यावेळी त्यांनी त्या व्यक्तीला पाहिले होते. त्यानंतर त्यांनी रेल्वे थांबवली. त्यावेळी टी. टी. आय. यांनी सोलापुरलाच उतरून तक्रार दाखल करा किंवा दादरला तक्रार दाखल करा असे सांगीतले. त्यामुळे ते दादरला गेले आणि त्याठिकाणी फिर्याद दाखल केली. (आता साक्षीदाराला सदर फिर्याद नि. २९ दाखविण्यात आली.) त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. दादर पोलीसांनी सदर तक्रार सोलापुर पोलिसांकडे वर्ग केली. त्यानंतर दिनांक २८/०८/२००६ रोजी सोलापुर पोलिसांनी त्यांना सोलापुर लोहमार्ग पोलिस ठाण्यात बोलावले. त्यावेळी त्यांनी त्यांना आरोपींची छायाचित्रे दाखवली. त्यात त्यांनी त्यांची चैन ओढणा—याला ओळखले. त्याचे नाव

संतोष जाधव असल्याचे पोलिसांनी सांगीतले. त्याच्या सोबत असणा—या इतर दोघ ाां—तिघांची नावे देखिल पोलिसांनी त्यांना सांगीतले. सदर नावे दिपक गायकवाड, पप्पु गायकवाड आणि इतर असल्याचे पोलिसांनी त्यांना सांगीतले होते. त्यावेळी पोलिसांनी त्यांना सदर १५ ग्रॅम वजनाची सोन्याची गोळी दाखवली. ती त्यांना न्यायालयाकडुन परत मिळाली आहे. परंतु, त्यांनी सदर गोळी घाई घाईत आज सोबत आणली नाही. सदर आरोपी संतोषला मी ओळखु शकते.

**<u>उलटतपास आरोपी क्रमांक १ आणि २ तर्फे वकील श्री. यरोळ</u>**

२. हे खरे आहे कि, मी अज्ञात इसमाविरूध्द फिर्याद दिली आहे आणि मी चैन चोरताना आरोपीला पाहिलेले नव्हते.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक :— १५/१०/२०१६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, दौंड
सोलापूर येथील दौरा.

नि. फौ. ख. क्र. ७३/२००७.
नि. क्र. ८४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ ची साक्ष**

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नाव :— सचिन सुभाष पोतदार,

वय :— ३२, व्यवसाय :— ऑटोरिक्षा चालक.

राहणार :— हांडे प्लॉट, जुना पूणे नाका, सोलापूर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे स.स.अ. अभियोक्ता श्री. ए. ए. डोके यांचेकडुन**

०१. दिनांक ३०/०७/२००७ रोजी ते हांडे प्लॉट जुना पुना नाका, सोलापूर येथील दुकानी होते. त्या दिवशी त्यांच्याकडे एक मुलगा नामे तुम्ही सचिन गायकवाड आला होता. तुम्हाला पोलिस घेऊन आले होते. तुम्ही आरोपी सचिनने पोलिसांनी असे सांगितले की, तुम्ही त्यांना सोने विकले आहे. दिनांक ३०/०७/२००७ पूर्वी ८ ते १० दिवसापूर्वी तुम्ही आरोपी सचिन त्यांच्याकडे आला होता आणि तुमची आई आजारी असल्याचे कारण सांगून त्यांना ४ ग्रॅमचे मंगळसूत्र आणि १४ ग्रॅमची चैन आणि ४ ग्रॅम २० मिलीचे आणखीन एक मंगळसूत्र विकले होते. त्यावेळी ते सोनाराच्या दुकानात कामाला होतो. मी आरोपीला काहीतरी रक्कम दिली होती. परंतु ती आता मला आठवत नाही. या सर्व दागिन्यांचे मी १४ ग्रॅम ८१० मिली, ४ ग्रॅम आणि ४ ग्रॅम २० मिली याप्रमाणे तीन गोळया बनविल्या होत्या. पोलिसांना त्या दिवशी मी सदर गोळया काढून दिल्या आणि पोलिसांनी त्या जप्ती पंचनाम्याअन्वये जप्त केल्या. आरोपी सचिन आज न्यायदालनात हजर आहे. सदर गोळया मी ओळखू शकतो.

**उलटतपास आरोपी क्रमांक १ तर्फे ॲड. डी. एस. येमूल यांचेकडुन**

०२. मी सोनार नाही. पोलिसांनी मला आरोपी बनविलेले नाही. हे खरे नाही

की, आरोपी सचिनने आमच्याकडे काहीही मुददेमाल आणून दिलेले नाही आणि मी त्याची गोळी तयार केली नाही आणि मी पोलिसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

(आरोपी दिपक आणि पिंट्या यांचे विधीज्ञ अनेकदा पुकारुन गैरहजर. आरोपींना साक्षीदाराची उलटतपास घेण्याची संधी दिली असता, त्याने उलटतपास घेण्याचे नाकारले.)

उलटतपास पूर्ण. श्रवणोत्तर स्वीकृत

फेरतपास नाही.

दिनांक — ०५/०७/२०१७ ( ओ. शि. पाटील )

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

लोहमार्ग न्यायालय दौंड

सोलापूर येथील दौरा.

**नि. फौ. ख. क्र. ६३/२००७**
**नि. क्र. ८८**

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ५ ची साक्ष

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नाव :– कुमार गुलाबराव घाडगे,

वय :– ४३ वर्ष , व्यवसाय :– नोकरी,

राहणार :– सन सिटी, ढेबेवाडी फाटा, कराड, ता. कराड, जि. सातारा.

## सरतपास अभियोगपक्षातर्फे स.स.अ. श्री. ए. ए. डोके यांचेकडुन

०१. सन २००७ मध्ये मी लोहमार्ग पोलिस ठाणे, सोलापूर येथे पोलिस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत असताना गु.र.क्र. ३३/२००७ चा तपास माझ्याकडे देण्यात आला होता. त्यावेळी आरोपी सचिन, अविनाश आणि दिपक हे आमच्या पोलिस ठाण्यातील दुस–या गुन्ह्यात अटकेत होता. त्यानंतर दिनांक ३०/०७/२००७ रोजी आरोपी सचिनने पोलिस कोठडीत निवेदन दिले होते की, तो आणि त्याचे साथीदार यांनी मिळून सोलापूर रेल्वे स्थानकाच्या पुलावरुन एक महिला जात असताना तिच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र ओढून तोडून चोरले होते. तसेच मे २००७ मध्ये शेवटच्या आठवड्यात त्याने आणि पप्पू उर्फ कुबड्या अमृत जाधव, पिंट्या गायकवाड यांनी रात्री ८.०० वाजता कन्याकुमारी एक्सप्रेसमधील महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र संतोष उर्फ पप्पू याने ओढून चोरले होते. तसेच जानेवारी महिन्यात बाळे रेल्वे स्थानकावर रात्री ११.०० ते १२.०० वाजण्याच्या दरम्यान खिडकीजवळ बसलेल्या एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढून चोरले होते. हे सर्व दागिने त्यांनी सचिन पोतदार यांना विक्री केले होते. त्याचे घर दाखविण्याची त्याने तयारी दर्शविली. त्याप्रमाणे मी आरोपीचे दोन पंचांसमक्ष निवेदन नोंदविले. त्यानंतर आरोपी सचिनने आम्हाला हांडे प्लॉट, पुना नाका, येथे नेले. त्या ठिकाणी

आरोपीने सचिन पोतदार याचे घर दाखविले. त्या ठिकाणी सचिन पोतदारने मान्य केले की, आरोपी सचिनने त्याला दोन सोन्याचे मंगळसूत्र आणि एक चैन विक्री केली असून त्याची त्याने लगड आणि गोळी तयार केली आहे. त्याप्रमाणे त्याने ते काढून दिले आणि मी दोन पंचासमक्ष जप्त केले आणि त्याबाबत जप्ती पंचनामा केला. (आता साक्षीदाराला निवेदन आणि जप्ती पंचनामा — निशाणी क्रमांक २४ दाखविण्यात आला.) त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर सत्य व बरोबर आहे. त्यानंतर मी महत्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवून आरोपींविरुध्द आरोपपत्र दाखल केले. सदर मुद्देमाल मी ओळखू शकतो. आरोपी सचिन आणि गोपाळ आज न्यायदालनात हजर आहे.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास ॲड. पी. एम. ढालाईत यांच्याकडून.</u>**

०२. मी पोतदार यांना आरोपी केलेले नाही. मी पंचनाम्याला जाण्यापूर्वी आणि आल्यानंतर स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. तसे करण्यास मला अडचण नव्हती. हे खरे नाही की, मी त्या ठिकाणी गेलोच नव्हतो म्हणून मी तशी नोंद केलीनाही. जप्त मुद्देमालाचे वजन करुन त्याची पावती घेण्यात आलेली आहे. तसेच सदर लगडी या सोन्याच्याच आहेत, याबाबत देखील पावती घेण्यात आलेली आहे. परंतु ती पावती आरोपपत्रासोबत नाही. हे खरे नाही की, आम्ही सोने आहे याची खात्रीच केली नाही आणि सोने जप्तच केले नाही. पोतदारच्या घराच्या आजूबाजूचे पंच मी घेतले नाही. घटनास्थळाचा पंचनामा मी केलेला नाही. हांडे प्लॉट ते आमचे ठाणे यातील अंतर चार कि.मी. इतके आहे. आम्ही कुठल्या मार्गे त्या ठिकाणी गेलो होतो आणि रस्त्यातील खाणाखुणा पंचनाम्यात नमूद नाही. मी पोतदारच्या तथाकथित घराचा पंचनामा केला नाही. मी ओळख परेड घेतलेली नाही. हे खरे नाही की, सरतपासातील प्रत्येक शब्द खोटा आहे आणि सरतपासात सांगितल्याप्रमाणे अशी कोणतीही घटना कधी घडली नाही आणि आरोपीने कसल्याही प्रकारचे निवेदन दिले

नाही आणि सोनार दाखविले नाही आणि मुद्देमाल जप्त करण्यात आला नाही आणि मी पोलिस ठाण्यात बसून सराईत पंचांना घेऊन खोटा पंचनामा तयार केला आहे आणि मी आज खोटी साक्ष देत आहे आणि मी खोटा तपास करुन आरोपींविरुध्द खोटे आरोपपत्र दाखल केले.

उलटतपास पूर्ण. श्रवणोत्तर स्वीकृत

फेरतपास नाही.

दिनांक — ०४/०४/२०१८ ( ओ. शि. पाटील )

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

लोहमार्ग न्यायालय दौंड

सोलापूर येथील दौरा.

## : <u>शेरा</u> :

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईल मधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : एस.के. तोरणे
कोर्टाचे नाव : ओ. शि. पाटील., न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, लोहमार्ग न्यायालय, दौंड
निकालाची तारीख : २१/०५/२०१८
निकालपत्र सही केल्याची तारीख : २१/०५/२०१८
निकालपत्र अपलोड केल्याची तारीख : ०५/०६/२०१८